
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय ......वा.वा.
दा. क्र. २७०९

BVBK-0402791

२८९१
९/८/८३




र सखाराम

BVBK-0402791

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य सात रुपये

प्रकाशक :
ल० गो० परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन,
३० सी, खोताची वाडी,
गिरगांव, मुंबई ४

पहिली आवृत्ती :
२६ जानेवारी १९९२

© ज्योत्स्ना प्रकाशन

लेखक :
शंकर सखाराम
जेएन/१/१४/बी-१०, सेक्टर ९
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३


मुखपृष्ठ व आतील चित्रे :
पुंडलीक वझे

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४


चिं. नेहास

शंकर सखाराम

# चिमणी कावळ्याची शेती




एकदा चिमणी-कावाळ्याने केली शेती.
पाऊस पडला वेळेवर,
पेरणी केली माळावर.
पावसाने केले पाणीच पाणी,
लावणी झाली वेळच्या वेळी.
पीक आले जोरदार,
कणसे डोलली मजेदार.
कावळ्याने केली कापणी,
एकट्यानेच केली झोडणी.
भाताच्या भरल्या छोट्या गोणी.
तुसाच्या भरल्या मोठ्या गोणी.
मग कावळा चिऊताईला बोलावून म्हणाला
'चिऊताई चिऊताई तुझा वाटा मोठा.
मोठ्या मोठ्या गोणी तुला घे,
छोट्या छोट्या गोणी मला दे.
चिऊताई होती हुशार.
तिने साऱ्या गोणी हलवून पाहिल्या.
कावळ्याचा डाव तिच्या लक्षात आला.
ती म्हणाली,



'कावळेदादा तू आहेस जाडाजुडा,
मोठ्या गोणी तुला घे.
माझा जीव छोटा,
छोट्या गोणी मला दे.'
पण कावळा काही ऐकेना, चिमणीला भात मिळेना
मग चिमणी गेली देवाकडे.
देवाने केला न्याय.
छोट्या गोणी दोघांत वाटल्या
मोठ्या गोणी टाकून दिल्या,
देवाने चिमणीला वाटा मिळवून दिला.
कावळ्याला मात्र दंड केला.



# पैसेवाला पाहुणा



पाटलाकडे आला होता पाहुणा.
पाहुणा होता भारी ऐटीत.
चालत बोलत होता गर्वात.
राहत होता अगदी तोऱ्यात.

पाटलाने त्याला राहावयास एक मोठी खोली दिली होती. तिच्यात तो दिवसा झोपत होता आणि रात्री खणाखणा पैसे मोजत होता.

पैशांचा रात्रभर येणारा आवाज ऐकून पाहुणा मोठा पैसेवाला आहे असे लोकांना वाटले.

'पाटलाकडे मोठा पैसेवाला पाहुणा आलाय, रात्रभर तो पैसे मोजतोय' असे लोक एकमेकाला सांगू लागले.


बातमी गावभर पसरली.

लोक पाटलाला विचारू लागले.

पाटलाला तरी काय माहीत, तो फक्त पैशांचा आवाज ऐकत होता.

एके रात्री पाटलाने पाहुण्यावर पाळत ठेवली.

एवढे पैसे त्याने आणले कोठून, कसे आणले. पाटलाला काही कळेना.



रात्र झाल्यावर पाहुणा खणाखणा पैसे मोजू लागला. पैशांचा खणाखण, खणाखण आवाज जोरजोरात येऊ लागला. पाहुणा पैसे कसे मोजतोय ते पाटील चोरून पाहू लागला.

पाहुणा एकच रुपया दगडावर पुन्हा पुन्हा आपटून खणाखणा आवाज करत होता.

# सात शेपट्यांचा उंदीर

एक होता उंदीर. त्याला होत्या सात शेपट्या. तो एक दिवशी गेला शाळेत.

त्याच्या सात शेपट्या पाहून मुले त्याला चिडवू लागली,

'सात शेपट्यांचा उंदीर, सात शेपट्यांचा उंदीर!'

मग तो आला आईकडे

म्हणाला, 'आई सगळे मला सात शेपट्यांचा उंदीर' चिडवतात.

आई म्हणाली, 'जा हजामाकडे नि एक शेपटी कापून ये.'

उंदीर हजामाकडे गेला नि एक शेपटी कापून दुसऱ्या दिवशी शाळेत गेला.

मुले चिडवायला लगली.

सहा शेपट्यांचा उंदीर, सहा शेपट्यांचा उंदीर'!

मग तो आईकडे आला

म्हणाला, 'आई, मला मुले सहा शेपट्यांचा उंदीर चिडवतात.'

आई म्हणाली, 'जा हजामाकडे नि एक शेपटी कापून ये.'

उंदीर हजामाकडे गेला नि एक शेपटी कापून तिसऱ्या दिवशी शाळेत गेला.

मुले चिडवायला लागली,

'पाच शेपट्यांचा उंदीर, पाच शेपट्यांचा उंदीर!'

न राहून तो आईकडे आला.

म्हणाला, 'आई, मला आता पाच शेपट्यांचा उंदीर चिडवतात.'

आई म्हणाली, 'मग जा हजामाकडे नि एक शेपटी कापून ये.'

उंदीर पुन्हा एक शेपटी कापून चौथ्या दिवशी शाळेत गेला.

मुले चिडवायला लागली,

चार शेपट्यांचा उंदीर, चार शेपट्यांचा उंदीर!

उंदीर पुन्हा आईकडे आला. हजामाकडून एक शेपटी कापून शाळेत गेला. तरी मुले; तीन शेपट्यांचा उंदीर, तीन शेपट्यांचा उंदीर चिडवतच होती.

आता मात्र उंदीर वैतागला. तो साऱ्याच शेपट्या कापून शाळेत गेला.


तेव्हा मुले म्हणाली,

लांडाभुंडा उंदीर, लांडाभुंडा उंदीर!

मग तो शाळेत कधीच गेला नाही.

# चिमणी आणि कावळा

एक होती चिमणी,
एक होता कावळा.
चिमणीचे घर होते मेणाचे,
कावळ्याचे घर होते शेणाचे.
एक दिवस खूप खूप पाऊस पडला,
कावळ्याचे घर गेले वाहून.
काही दिवसांनी उन्हाळा आला,
चिमणीचे घर गेले वितळून.
मग दोघांनाही उरले नाही घर.
त्यांनी एकत्र बसून विचार केला
चिमणीने आणले मेण.
कावळ्याने आणले शेण.
शेण-मेण मिसळून मग त्यांनी बांधली घरे
घरांना छान छान दारे.
पावसाळा गेला,
उन्हाला आला.
शेणात मेण मिसळून घरे झाली घट्ट.
घरांत चिमणी-कावळा राहू लागली मस्त



# तीन भावंडे



तीन भावंडे एकत्र राहत होती.
दोन होते भाऊ,
एक होती बहीण,
एकदा ती तिघेही गेली मासे पकडायला.
भावांना मिळाले मोठे मासे,
बहिणीला मिळाला एक छोटा मासा.
घरी आल्यावर त्यांनी मासे टाकले भाजत.
नि सारी गेली नदीवर आंघोळीला.
येऊन पाहतात तो
बहिणीचा मासा करपला.
मग एकाने तिला दिले माशाचे डोके
दुसऱ्याने दिले शेपटे
तिघेही आनंदाने जेवली.






# टाकळा

देवाच्या दारांशी होतं एक झाड:
त्याला वास यायचा फार उग्र.
देव त्या वासाला अगदी कंटाळला.
काय करावे त्याला काही सुचे[redacted]
झाड डौलात होते डो[redacted]
ढगांशी होते मजेत खेळत.
देवाला आला त्याचा राग.
त्याने झाड उपटले
आणि पृथ्वीवर टाकले.
म्हणून त्याला म्हणतात टाकळा!

# खोडकर अस्वल

दाट रानात खोडकर अस्वल राहत होते.
खूप खायचे आणि भटकायचे हा त्याचा उद्योग.
भटकताना छोट्याछोट्या प्राण्यांना छळण्यात
अस्वल फार पटाईत होते.





त्याच्या छळण्याला छोटे छोटे प्राणी कंटाळले होते
एक दिवशी ते सशाला उगाचच छळू लागले.
त्याला पकडायला त्याच्या मागे धावू लागले.
पण ससा हुशार, तो टुणकन् उडी मारून
समोरच्या दोन मोठ्या दगडांच्या छोट्या
फटीतून पलीकडे पळून गेला.
अस्वल सशावर रागावले.
ते दगडाच्या फटीतून जाऊ लागले.
जाताजाता अडकून पडले.
हे पाहून सारे प्राणी हसले.

# कावळा आणि कंकावळा

कावळा आणि कंकावळा यांची होती मैत्री. कावळा काळा, तसाच घाणेरडा. कंकावळा पांढरा शुभ्र, स्वच्छ. दोघेही रोज रानात जायचे भारी आणायचे नि नगरात जाऊन विकायचे.

एक दिवशी कंकावळ्याने चंदनाची भारी तयार केली. नि विकायला नगरात गेला. अगदी राजाच्या दारासमोर जाऊन त्याने आवाज केला, 'भारी हवी का भारीऽऽ'

त्याचा आवाज ऐकून राणीने त्याला जवळ बोलावून विचारले, 'काय भारीचे?'

'द्या द्याल ते!' कंकावळा म्हणाला.

कंकावळ्याच्या भारीवर राणी खूष झाली नि म्हणाली, 'टाक भारी नि घरात जाऊन घे तुला हवे ते.'

कंकावळा भारी टाकून शेजारच्या घरात गेला. तर काय, घर सारे मोहांनी भरलले. कंकावळ्याने जेवढ्या मोहरा घेता येतील तेवढ्या घेतल्या नि घरी आला.

कंकावळ्याने मोहरा आणलेल्या पाहून त्याच्या

आईला मोठा आनंद झाला. मोहरा तर खूप म्हणून त्या मोजायला तिने शेजारच्या कावळ्याच्या आईची पायली आणली.

कावळ्याची आई होती धूर्त. तिने पायलीच्या तळाला लावून दिले मेण.

मोहरा मोजून झाल्यावर कंकावळ्याच्या आईने पायली परत केली. कावळ्याच्या आईने पायलीच्या तळाला पाहिले, तर मेणाला एक मोहर चिकटलेली. त्यावरून तिला सारा प्रकार कळला. ती रागावून कावळ्याला म्हणाली, 'तो कंकावळा बघ भारीच्या मोहरा आणतोय, नि तू-'

कावळ्यालाही आईच्या बोलण्याचा राग आला. दुसऱ्या दिवशी सकाळीच त्याने रानात जाऊन भारी



काढली नि राजाच्या दारावर जाऊन ओरडू लागला, 'भारी घ्या भारीऽऽ'

कावळ्याचे ओरडणे ऐकून राणीने त्याला वाड्यात बोलावून विचारले, 'काय भारीचे?'

'द्या मोहरा भरपूर'- कावळा पटकन म्हणाला.

कावळ्याचे अंग होते कसेतरी नि भारी होती काटक्यांची. तरी राणी म्हणाली, 'टाक भारी नि पलीकडच्या घरातून घे तुला हवे ते.'

भारी टाकून कावळा धावतच पलीकडच्या घरात गेला. पाहतो तर सारे घर काचेच्या गाठ्या गरसळ्यांनी भरलेले. त्याने घेता येतील तेवढ्या गाठ्या गरसळ्या घेतल्या नि धूम धावत घरी आईजवळ गेला. 'हे घे.' आईसमोर ते गाठोडे टाकून म्हणाला. आईने गाठोडे सोडून पाहिले तर त्यात काचेच्या गाठ्या गरसळ्या. कुठे कंकावळ्याच्या मोहरा नि कुठे हे काचेचे मणी-

कावळ्याच्या आईने झाडू घेतली नि कावळ्याला चांगले झोडपून घरातून हाकलून दिले. तेव्हापासून कावळा एकटाच बसून कावकाव करीत असतो.

# तीन बुक्के

एक होता लाकूडतोड्या.

तो रोज रानात जायचा, लाकडे फोडायचा, बाजारात विकायचा नि पोट भरायचा.

रानात जाताना दुपारसाठी अर्धवट फुटक्या जुन्या मडक्यात कसलीशी पेज करून न्यायचा. मडके झाडाला टांगायचा नि लाकडे फोडायचा.

एक दिवशी ह्या झाडाखालून देव जात होता. देवाने वर पाहिले तर झाडाला हे जुनेपुराणे मडके. देवाला दया आली. त्याने मडक्यातील पेज ओतून आशीर्वादाच्या तीन मुठी मडक्यात टाकल्या नि पुढे निघून गेला.

दुपारी लाकूड फोड्या भूक लागल्याने झाडाखाली आला. मडके काढून जेवायला बसला. पाहतो तो मडक्यात तीन लाडू. त्याला काही कळेना. पण भूक मात्र जोराची लागलेली. त्याने तीनही लाडू पटापट संपवले. पण तीन लाडू संपल्यावर पुन्हा मडके भरलेले. मग त्याने पुन्हा तीन लाडू खाल्ले. तरी पुन्हा मडके भरलेलेच.

मग तो धावतच घरी आला. घरातील साऱ्यांना


त्याने लाडू दिले. साऱ्यांनी पोटभर लाडू खाल्ले तरी मडके रिकामे होईना. मग त्याने लाडूंचे दुकान टाकले. काही दिवसांतच तो श्रीमंत झाला.

काही दिवसांनी लाकूड फोड्याच्या श्रीमंतीचे गुपित शेजाऱ्याला कळले. मग त्या शेजाऱ्याने बाजारात जाऊन एक मोठ्ठे नवे मडके आणले. बदामाची चवदार खीर तयार केली नि मडक्यात भरून रानात गेला.

मडके झाडाला टांगून लाकडे फोडण्याचा खोटाखोटा आवाज करीत देवाची वाट पाहू लागला.

थोड्याच वेळानी देव नेहमीप्रमाणे झाडाखाली आला. पण आज झाडाला नवे मडके. देवाने मडके उघडून पाहिले. मडक्यात बदामाची खीर. देवाने खीर ओतली नि प्रसादाच्या तीन मुठी मडक्यात टाकून निघून गेला.

शेजारी धावतच मडक्याजवळ आला. त्याने अगदी आनंदाने मडके उघडले. तो मडक्यातून तीन बुक्के बाहेर आले नि त्याला बदाबदा बदाबदा मारत सुटले. खूप मार खाल्ल्यावर तो मडके बंद करून घरी आला. घरी तर सारे लोक त्याची वाट पाहत बसले होते. गावातील भजन मंडळही आले होते.



२७९७
बा.वा.

त्याने लगेच जाऊन सर्वांच्या मध्ये मडके उघडले. मडक्यातून तीन बुक्के बाहेर पडले नि त्यांनी साऱ्यांना बदडायला सुरूवात केली. भजन मंडळीचे पेटी, तबले फुटले. सारीकडे नुसती बदडाबदड. मग जो तो मिळेल त्या वाटेने पळू लागला.तरी मागून बुक्के येतच होते.

# अविचारी उंदीर

सराईचे दिवस होते.
साऱ्या शेतांत पिवळे धम्मक भात डोलत होते.
उंदरांची मजा झाली होती.
पिवळ्या कणसांतील मोत्यांसारखे पांढरे स्वच्छ
दाणे खायचे आणि खेळायचे,
एका उंदराच्या डोक्यात एक विचार आला.
आता खूप धान्य आहे, पावसाळी काही नसते.
पावसाळ्यासाठी आताच साठवून ठेवले तर!
पण साठवणार कुठे?
त्याच्या पुढे प्रश्न पडला.
साऱ्या उंदरांनी जागा जिंकल्या होत्या.
समुद्राला मात्र ओहोटी चालू होती.
तेथे भरपूर जागा मोकळी होती.
उंदराने तेथे पटकन बीळ खणले
आणि त्यात भात साठवू लागला.
साठविता साठविता बीळ गेले भरून.
भरलेले बीळ पाहून उंदीर गेला हरखून.
समुद्राच्या ओहोटीची वेळ संपली,
भरती सुरू झाली.
पाणी वरवर चढू लागले.

उंदराच्या बिळात शिरले.
पाण्याबरोबर बिळातील भात बाहेत पडले·
लाटांबरोबर वाहून गेले.

## राक्षस आणि पाटलाची युक्ती

गावाबाहेरच्या गुहेत मोठ्ठा राक्षस राहत होता.
गावात येऊन तो गुरे-वासरे, माणसे खाई.
हळूहळू गाव रिकामा होऊ लागला.
गाववाल्यांनी राक्षसाची भेट घेतली.
रोज त्याला गोळाभर अन्न कबूल केले.
राक्षसाला रोज गोळाभर अन्न जाऊ लागले.
राक्षसाची भूक पुढे वाढली.
त्याला आणखीन अन्न लागू लागले.
लोक कंटाळले.
पाटलाने युक्ती केली.
रोजच्या अन्ना एवढा लोखंडाचा गोळा तयार केला
राक्षसाला रोजच्यासारखा दिला.
गोळा त्याच्या तोंडात अडकला.
गोळा अडकून राक्षस मेला.

# आधी कळस मग पाया

नगरीमध्ये राजा फिरत असताना त्याला सगळीकडे बांधकामे चालू असलेली दिसली. कुठे घर, कुठे शाळा, कुठे मंदिर तर कुठे कूस बांधणे होत होते.

राजाने सगळी बांधकामे पाहिली. त्या बांधकामांत त्याला एकच गोष्ट सगळीकडे सारखी दिसली. आधी पाया घातला जातो मग त्यावर बांधकाम केले जाते. आधी पाया मग कळस.

फिरता फिरता राजाच्या मनात कल्पना आली, आधी कळस मग पाया असे बांधकाम केले तर?

राजाने नगरात दवंडी पिटविली.

आधी कळस मग पाया असे बांधकाम कोण करील त्याला योग्य इनाम दिले जाईल.

दवंडीप्रमाणे लोकांनी बांधकामाला सुरवात केली. पण आधी कळस मग पाया असे बांधकाम कुणाला जमेना.

असे खूप दिवस गेले.

एक दिवस राजाकडे काही शिल्पकार आले. त्यांनी राजाला हवे तसे बांधकाम करून देण्याचे कबूल केले.

शिल्पकार कामाला लागले.

नगराबाहेरच्या डोंगरावर छिन्नी हतोड्यांचे आवाज येऊ लागले.

बघता बघता डोंगरावरच्या दगडातून मंदिर घडू लागले.

ना विटा, ना सिमेंट, ना पाणी, ना लाकूड.


आधी कळस घडला. मग भिंती.

सुंदर मंदिर उभे राहिले.

एका दगडातून तीन मजले सजले.

राजाला हवे तसे बांधकाम घडले.

आधी कळस मग पाया.



# तलावावरचा बेडूक

सारीकडे बोरी.
अशा बोरगावात एक तलाव होता.
तलावात स्वच्छ असे भरपूर पाणी होते.
सारा गाव ते पाणी नेत असे.
पाण्यावर कसले बंधन नव्हते.
लोकांना हवे तेवढे पाणी मिळत होते.
काही दिवसांनी तलावावर
अचानक येऊन एक बेडूक बसला.
म्हणायला लागला, 'माझे पाणी, माझा तलाव'
साऱ्यांना केला त्यांनी अटकाव.
पण एवढासा बेडूक आणि एवढा मोठा तलाव,
बेडूक तलावाच्या एका बाजूला गेला,
की लोक दुसऱ्या बाजूने पाणी नेऊ लागत.
बेडूक इकडून तिकडे धावू लागला.
पण एवढ्या मोठ्या तलावाला तो कसा पुरणार!
त्याने सारा तलाव व्यापण्यासाठी आपले हातपाय लांब केले.
लांब करता करता त्याचे सारे अंग फाटले.
अंगाचे तुकडे होऊन पडले.

# पाच आळशी

गावात पाच आळशी होते.

घरात खायचे आणि गावभर भटकायचे हा त्यांचा रोजचा उद्योग. एके दिवशी त्यांच्या आईबापांनी त्यांना घरांतून हकलून दिले. सांगितले, दिवस मावळायच्या आत तुम्ही हे गाव सोडून जा.

पाच जण निघाले दुसऱ्या गावाला.

गावाबाहेर जायला लागत होती होडी.

सारेजण बसले होडीत.


मोजू लागले एकमेकांना. एक-दोन-तीन-चार. पाचवा त्यांना मिळेचना.

प्रत्येकजण स्वत:ला सोडून इतरांना मोजत होता. असे मोजता मोजता झाली संध्याकाळ. एकजण त्यांना सापडलाच नाही!



# युक्तीबाज कोल्हा

एका सकाळी देव रानाच्या फेरीला निघाला.
वाटेत एका बिळातून कसला तरी आवाज येत होता.
देवाने पाहिले तर
बिळाच्या तोंडावर एक मोठा दगड पडलेला होता.
कोणीतरी बिळात अडकून पडले होतं.
आतला आवाज ऐकून देवाने विचारले,
'कोण आहे रे आत?'
आतून आवाज आला, 'तू कोण आहेस?'
देव म्हणाला, 'मी देव आहे.'
आतून आवाज आला, 'कशावरून?'
देव म्हणाला, 'तू सांगशील ते मी करून दाखवीन!'
आतून पटकन आवाज आला,
'मग पाऊस पाडून दाखव.'
त्याबरोबर देवाने पाऊस पाडायला सुरूवात केली.



पाऊस पडल्याबरोबर पाणीच पाणी झाले,
जमीन मऊ झाली.
आत अडकलेल्या कोल्होबाने मऊ मातीतून
झटकन वाट काढली नि बिळाबाहेर येऊन
रानात धूम पळाला.
देव मात्र पहातच राहिला.

# बोलक्या बाहुल्या

शिकारी आपल्या बायकोसह राहत होता.

तो रोज शिकारीला जायचा. शिकार आणायचा. आणलेली शिकार बायकोकडे द्यायचा नि नदीवर आंघोळीला जायचा. आंघोळ करून आल्यावर जेवायला बसायचा. पण जेवणात मांसाचा एक पण तुकडा नसायचा, सारी हाडके, आपण तर रोज चांगली मांसाची शिकार आणतोय, मग मांस जातेय कुठे? त्याला काही कळेना. मात्र त्याची बायको चांगली जाडीजुडी होत चालली होती.

काही दिवसांनी त्याल एक युक्ती सुचली. त्याने सुताराकडे जाऊन दोन बोलक्या बाहुल्या बनवून आणल्या.

तो दुसऱ्या दिवशी शिकारीहून आला नि नेहमीप्रमाणे शिकार बायकोजवळ देऊन नदीवर आंघोळीला निघाला. निघताना त्याने दोन बाहुल्या दोन दारांवर बसवून ठेवल्या नि सरळ नदीवर गेला.

शिकारी नदीवर गेला हे पाहून बायकोने शिकार शिजवली नि रोजच्याप्रमाणे शिजलेले मांसमांस ताटात घेऊन एकटीच जेवायला बसली. पहिला घास घेणार

इतक्यात पुढच्या दारावरची बाहुली बोलली

'आला ग आला'

तिला वाटले खरेच तो आला. ती ताट तसेच ठेवून पुढच्या दारात बघायला गेली, तो कुणीच नाही.

पुढच्या दारात ती बघते इतक्यात मागच्या दारावरची बाहुली बोलली.

'आला ग आला-'

तिला वाटले तो मागच्या दारातून आला. ती तिकडे गेली. तिथेपण कुणी नाही.

मग ती ताटाजवळ आली नि घास घेणार इतक्यात पुढच्या दारावरची बाहुली बोलली,



‘आला ग आला’


तिने पुन्हा ताट तसेच टाकले नि पुढच्या दारात पाहू लागली, तो कुणीही नाही. पुढच्या दारातून पाहते तो मागच्या दारावरची बाहुली बोलली,

‘आला ग आला...’

अशाप्रकारे तिलाकाही बाहुल्यांनी जेवू दिले नाही.

थोड्या वेळाने शिकारी नदीवरून अंघोळ करून परतला. आल्याबरोबर बायकोने त्याला जेवण वाढले. आज मात्र ताटात मांसाचमांस होते.

शिकाऱ्याने काही दिवस दोन्ही दारांवर अशाच बाहुल्या बसवून ठेवल्या. मग बायको काय समजायचे ते समजली. पुन्हा कधी ती शिकाऱ्याआधी चोरून जेवली नाही.



# आजीचे आभाळ

[illegible] २७७९ दिनांक
[illegible] बा. वा.

गावाबाहेर आजीचे एक घर होते.
घरात आजी एकटीच राहत असे.
वेळ मिळाला की ती उखळीत तांदूळ सडत बसे.
पण तेव्हा आभाळ एवढे खाली होते की
ती तांदूळ सडायला लागली की ते तिच्या मुसळाला
खट खट लागे.
एक दिवशी आजीला आभाळाचा आला राग.
ती घरातून झाडू घेऊन आली
नि आभाळाला झोडपू लागली.
आभाळ घाबरले.
ते वरवर पळू लागले.
खूप वर गेले.
मग आजीलाच कसेतरी वाटले.
ती आभाळाला म्हणाली, 'अरे बाबा थांब आता!'
आभाळ तेव्हा तेथेच थांबले.
तेच हे आजीचे आभाळ.

# लबाड वाटपी

राजनगरी बाहेर कालव्याचे खोदकाम चालू होते.

कामावर कित्येक मजूर खपत होते. सकाळी ते कामावर येत, संध्याकाळी आपापल्या वाट्याचे धान्य घेऊन ते घरी जात. प्रत्येक मजुराला पोटाला लागेल इतके धान्य दे असे धान्य-वाटपीला राजाने आधीच सांगितले होते.

कालव्याचे काम खूप मोठे होते. मजुरांची मोठी गरज होती. पण मजुरांची संख्या मात्र रोज घटत चालली होती. कुणी आजारी पडत होते तर कुणाला काम करता करता घेरी येत होती. राजाला असे का होतेय याचे कारण कळत नव्हते.

त्याने आजारी मजुरांसाठी औषधपाण्याची सोय केली. तरीपण मजुरांची संख्या घटतच होती.

राजाने स्वत:च मग मजुर बनून कारण शोधण्याचा प्रयत्न केला.



दिवसभर कलाव्यावर काम केले. संध्याकाळी वाटयाचे धान्य घ्यायला गेला तर वाटपी उलटी पायली ठेवून सर्वांना धान्य देतोय.

राजाला मजूर घटण्याचे कारण कळले. मजुरांना पुरेसे धान्यच मिळत नव्हते. ते वाटपीच्या घरात साठत होते.

त्याने वाटपीला लगेच कालव्यात फेकून दिले.

कालव्याचे काम जोरात सुरू झाले.

# उतावळा राक्षस

दोन भावंडे रानात फिरत होती.

एक होता भाऊ. एक होती बहीण.

भावंडे फुले वेचत, गाणे गात चालली होती. चालताना त्यांना राक्षसाने पकडले. भावाने त्याची खूप विनवणी केली. पण तो त्यांना सोडेना.

बहीण तर रडू लागली. बहिणीचे रडणे पाहून भाऊ राक्षसाला आणखीन आणखीन विनवू लागला. तेव्हा राक्षस म्हणाला, 'मी तुला सोडतो पण तुझ्या बहिणीने माझ्याशी लग्न करायला हवे.'

राक्षसाची अट ऐकून भाऊ गोंधळला, त्याला काय करावे कळेना. आपली बहीण किती नाजुक आणि छोटी, पण हा राक्षस? राक्षसाने थैमान घातले होते.

भावाला सुचली एक युक्ती.

तो राक्षसाला म्हणाला, 'माझी बहीण तुमच्याशी लग्न करील, पण ती किती गोरी नि सुंदर आहे पहा. तुम्हीही गोरे नि सुंदर व्हायला हवे.'

'मग मी गोरा नि सुंदर कसा होणार ते सांग' राक्षस उतावळा होऊन म्हणाला.

मी सांगतो तसे करा असे म्हणून भाऊ कामाला लागला.

त्याने राक्षसाकडून मोठ्या चुलीवर भली मोठी कढई ठेवून घेतली. तिच्यात तेल ओतून घेतले, चूल पेटविली. तेल उकळू लागले.

भाऊ राक्षसाला म्हणाला, 'आता त्या तेलात मारा उडी म्हणजे तुम्ही गोरे नि सुंदर व्हाल.' राक्षसाने क्षणाचाही विलंब न लावता कढईत उडी घेतली. राक्षस उकळत्या तेलात चांगलाच तळून निघाला.



# कोंबडेवाला शेतकरी

शेतकऱ्याचे घर कोंबड्यांनी भरून गेले होते. सारीकडे कोंबड्यांची कुजबुज.

शेतकरीही अस्सल कोंबडे खाणारा. पण झाले होते असे, शेतकऱ्याने कोंबडा शिजवायला घेतला की पाहुणा हजर. त्याला पोटभर काही कोंबडा खायला मिळेना.

एक दिवस मात्र त्याला मोकळा मिळाला.

घरी कुणीच पाहुणा आला नाही.

शेतकऱ्याने एक मोठा कोंबडा शिजवायला घेतला. कोंबडा मस्त शिजला. वास घरभर पसरला. पण जेवायला घेणार इतक्यात एक पाहुणा हजर. शेतकऱ्याच्या तोंडात सुटली लाळ तशीच जिरली. अखेर शेतकरी आणि बायको न जेवताच पाहुण्याबरोबर झोपी गेली.

मात्र अर्ध्यारात्री उठून जेवायचे असे शेतकरी आणि बायको यांचे ठरले.

त्यासाठी बरोबर अर्ध्या रात्री गुपचुप उठावे म्हणून शेतकऱ्याने आपल्या हाताला दोरी बांधून बायकोच्या हातात दिली.



शेतकऱ्याचे आणि बायकोचे जे ठरले ते पाहुण्याला बरोबर समजले.

रात्री पाहुण्याने शेतकऱ्याच्या हाताची दोरी सोडली आणि स्वत:च्या हाताला बांधली.

अर्ध्या रात्री पूर्वी ठरल्याप्रमाणे बायकोने शेतकऱ्याच्या हाताची दोरी हलविली.

सारीकडे काळाकुट्ट अंधार होता.

अंधारात पाहुणा उठला.

शेतकऱ्याच्या बायकोने अंधारातच कोंबड्याचे जेवण वाढले. पाहुणा न बोलता भरपूर जेवला. ढेकर देत झोपी गेली.

# मुके चोर

परगावातून गावात राहायला दोन मुके आले होते.
काम करत होते, खात होते.
कुणाशी बोलत मात्र नव्हते.
ते कुठले? का आले? कसे आले? ह्याचा कुणालाच पत्ता नव्हता.
काही दिवसांनी मात्र त्यांचा संशय येऊ लागला.
पण मुक्यांकडून काही माहिती मिळेना.
हे कोण? कुठले? लोकांना प्रश्न पडला.
गावकऱ्यांनी युक्ती केली.
त्या दोघांना गावकीचे जेवण बनवायला सांगितले.
त्यांनी ते कसेबसे केले.
लोक जेवण जेवू लागले.
जेवता जेवता बोलू लागले, ‘काय सुरेख जेवण बनविले आहे! कुणी बनविले कुणास ठाऊक!
गावकऱ्यांचे हे स्तुतीचे उद्गार ऐकून एका मुक्याला राहवले नाही, तो पटकन् म्हणाला,
‘मी बनविले जेवण’
त्यावर दुसरा मुका म्हणाला, ‘ह्याने नाही, मी बनविले जेवण,’

मुके बोलतात हे लोकांच्या लक्षात आले.
लोकांनी त्यांना सारे विचारले.
मुके चोर निघाले.
लोकांनी त्यांना फौजदाराकडे दिले.



BVBK-0402791

२६०९
बा.वा.